# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ

कृषि नगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र)

सूचना का अधिकार

कुलसचिव दुरध्वनी : ०७२४-२२५८३७२


वाचा: १) महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक : जमीन-२०१८/प्र.क्र.९२/(भाग-१)/ज-१अ, दिनांक ३० जुलै, २०२१.

२) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भुमिअभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी विभागीय आयुक्त (सर्व) व मा. सहसंचालक, कृषि यांना दिलेले निर्देश दिनांक ०५/०८/२०२१.

## परिपत्रक

जा.क्र. साप्रवि/जमिन/ई-पीकपाहाणी/१४०८ /२०२१ दिनांक : १४ सप्टेंबर, २०२१

या परिपत्रकाव्दारे सर्व (संबंधित) विभाग प्रमुख/ प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय/ कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र/ प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र/ सहयोगी अधिष्ठाता व इतर संबंधित अधिकारी यांना कळविण्यात येते की, शासनाने पीक पेरणीची माहिती भ्रमणध्वनीवरील ॲप व्दारा (Mobile App) गा.न.नं. १२ मध्ये नोंदविण्यासाठी स्वतः शेतकऱ्यांनी उपलब्ध करुन देण्याचा "ई-पीक पाहाणी" कार्यक्रम संपूर्ण राज्यात राबविण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय महसुल अधिकारी व प्राधिकारी यांना दिशानिर्देश देणेबाबत संदर्भिय शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

त्याअनुषंगाने सर्व महसुल मंडळाव्दारे ई-पीक पाहाणी मोबाईल ॲपव्दारे सादर करणेबाबत सुचित केलेले आहे.

तरी विद्यापीठातील सर्व संबंधित अधिकारी यांनी विद्यापीठाच्या जमिनीचा वरील शासन निर्णयानुसार मोबाईल ॲपव्दारे पीक पेरणी अहवालामध्ये (गा.न.नं. १२ मध्ये) नोंदणी करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

याप्रकरणी काही अडचण असल्यास संबंधित तलाठी यांचेशी संपर्क साधावा. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळ www.maharashtra.gov.in व विद्यापीठाचे संकेतस्थळ www.pdkv.ac.in वर उपलब्ध आहे.

स्वा/-
कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रतिलीपी आवश्यक कार्यवाहीकरीता :

१) सहयोगी अधिष्ठाता (सर्व) ----------------------------------------

२) संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, अकोला/ मुख्य बिजोत्पादन अधिकारी, म.प्रा.प्र., वणी रंभापूर

३) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र (सर्व) ----------------------------

४) विभाग प्रमुख, कृषि विद्या, उद्यानविद्या, पशु संवर्धन व दुग्धशास्त्र विभाग ------------------

५) प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय (सर्व) ----------------------------------

६) कार्यक्रम समन्वयक (सर्व) ----------------------------------------

७) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष (ARIS Cell), यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

(कृ.म.पहा)

प्रत माहितीकरीता सादर :

१) मा. संशोधन संचालक / अधिष्ठाता (कृषि) / संचालक, विस्तार शिक्षण / सहयोगी अधिष्ठाता, कृषि अभियांत्रिकी / नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / अधिष्ठाता, उद्यानविद्या / सहयोगी अधिष्ठाता, निम्न कृषि शिक्षण, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.

२) मा. कुलगुरू यांचे स्विय सहायक यांना मा. कुलगुरू महोदय यांचे माहितीकरीता सादर.

उपकुलसचिव (सामान्य प्रशासन)
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

**पीक पेरणीची माहिती भ्रमणध्वनी वरील ॲप द्वारा (Mobile App) गा.न.नं. १२ मध्ये नोंदविण्यासाठी स्वत: शेतकऱ्यांनी उपलब्ध करुन देण्याचा "ई-पीक पाहणी" कार्यक्रम संपूर्ण राज्यात राबविण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना दिशानिर्देश देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः जमीन-२०१८/प्र.क्र. ९२/(भाग-१)/ज-१अ**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक : ३० जुलै, २०२१**

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६, महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका (खंड-४) भाग-दोन महाराष्ट्र राज्यातील ग्राम पातळीवरील महसूली लेखांकन पध्दती, महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम,१९७१ यामधील तरतुदींनुसार राज्याच्या ग्रामीण क्षेत्रात ग्राम पातळीवर महसूली लेखे ठेवण्याकरिता विविध गाव नमुने व दुय्यम नोंदवहया विहित करण्यात आलेल्या आहेत. यामधील गाव नमुना नं ७ हा ***"अधिकार अभिलेख"*** विषयक असून गाव नमुना नं.१२ हा **"पिकांची नोंदवही"**ठेवण्यासंदर्भात आहे. उक्त नमूद नियमपुस्तिकेतील, गा.न.नं. ७-१२ संबंधी खुलासा (अधिकार अभिलेख आणि पिकांची नोंदवही) या शीर्षाखाली प्रकरणांमध्ये या एकत्रित नमुन्यावरील सर्वसाधारण सूचना तसेच पीक नोंदवहीमधील नोंदी घेण्या संदर्भातील कार्यपध्दती नमूद केलेली आहे. त्यानुसार, सध्या गाव नमुना नं.१२ मधील पिकांच्या नोंदी या संबंधित तलाठी यांनी घ्यावयाच्या असून, गावभेटी नंतर, सदर नोंदी चुकीच्या आढळल्यास, त्या दुरुस्त करण्याबाबतचा अधिकार मंडळ निरीक्षक किंवा त्याहून वरिष्ठ असलेल्या अधिकारी यांना आहे. तसेच सध्या **गा.न.नं.१२** मधील ***"पिकांच्या नोंदी"*** या सदरी संबंधित तलाठी हे पीक पेरणी अहवालाच्या नोंदी घेतात.

क्षेत्रीय स्तरावरुन पीक पेरणी अहवालाचा Real time crop data संकलित होण्याच्या दृष्टीने, तसेच, सदर data संकलित करताना पारदर्शकता आणणे, पीक पेरणी अहवाल प्रक्रीयेत शेतकऱ्यांचा सक्रीय सहभाग घेणे, कृषी पतपुरवठा सुलभ करणे, पीक विमा आणि पीक पाहणी दावे निकाली काढण्याची प्रक्रिया सुलभ करणे, नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास अचूक भरपाई आणि योग्य प्रकारे मदत करणे शक्य व्हावे इत्यादी उद्देशाने पीक पेरणीबाबतची माहिती भ्रमणध्वनी वरील ॲप द्वारा (Mobile App) गा.न.नं.१२ मध्ये नोंदविण्यासाठी शेतकऱ्यांनी स्वत: उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने (Farmer friendly App) टाटा ट्रस्ट्स यांनी आज्ञावली विकसित केली आहे. त्यानुसार मौजे करंजपाडा, तालुका वाडा, जिल्हा पालघर येथे प्रायोगिक तत्त्वावर सदर आज्ञावलीचा वापर करुन उत्सुक शेतकऱ्यांनी त्यांच्या स्मार्ट भ्रमणध्वनीमध्ये ॲपची स्थापना करुन पीक अहवालाची नवीन पध्दत स्विकारली, तद्नंतर सदर आज्ञावलीनुसार याबाबतचा पथदर्शी कार्यक्रम प्रायोगिक तत्त्वावर, राज्याच्या १० जिल्हयांतील निवडक २० तालुक्यांमध्ये राबविण्यात आला. त्यामुळे, आता टाटा ट्रस्टस मार्फत

तयार करण्यात आलेल्या आज्ञावलीनुसार *"ई-पीक पाहणी"* कार्यक्रम राज्याच्या सर्व जिल्हयांमध्ये राबविण्यासंदर्भात क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना दिशानिर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त पार्श्वभूमीवर, पीक पेरणी बाबतची माहिती गा.न.नं. १२ मध्ये नोंदविण्यासाठी शेतकऱ्यांनी स्वत: भ्रमणध्वनी वरील ॲप द्वारा उपलब्ध करून देण्याबाबतचा "ई-पीक पाहणी" हा कार्यक्रम टाटा ट्रस्ट्स ने विकसित केलेल्या आज्ञावलीचा वापर करून, त्यांच्या तांत्रिक व इतर अनुषंगिक बाबींच्या सहाय्याने व सहकार्याने दिनांक १५ ऑगस्ट,२०२१ पासून संपूर्ण राज्यात राबविण्याच्या दृष्टीने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

१. "ई-पीक पाहणी" हा कार्यक्रम Tata Trusts च्या सहकार्याने/मदतीने, त्यांनी विकसित केलेल्या आज्ञावलीद्वारे दिनांक १५ ऑगस्ट,२०२१ पासून संपूर्ण राज्यामध्ये राबविण्यात येईल.

२. राज्यस्तरीय ई-पीक पाहणी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरिता पुढीलप्रमाणे (अ) राज्यस्तरीय (ब) विभागस्तरीय (क) जिल्हास्तरीय (ड) तालुकास्तरीय संनियत्रण समिती गठित करण्यात येत आहे.:-

**(अ) राज्यस्तरीय संनियत्रण समिती**

| अ.क्र. | पदनाम | अध्यक्ष/ सदस्य |
|---|---|---|
| १ | जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख,महाराष्ट्र राज्य,पुणे | अध्यक्ष |
| २ | कृषी आयुक्त, पुणे | सह अध्यक्ष |
| ३ | सहकार आयुक्त, पुणे | सदस्य |
| ४ | साखर आयुक्त, पुणे | सदस्य |
| ५ | विभागीय आयुक्त, पुणे | सदस्य |
| ६ | पणन संचालक, पुणे | सदस्य |
| ७ | टाटा ट्रस्टचे प्रतिनिधी | सदस्य |
| ८ | सहयोगी अधिष्ठाता, कृषी महाविदयालय, पुणे | सदस्य |
| ९ | राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे प्रतिनिधी | सदस्य |
| १० | महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर/ पुणे यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ११ | कमिटीने नियुक्त केलेले दोन तज्ञ व्यक्ती | सदस्य |
| १२ | अग्रणी बँक व पीक विमा कंपनीचे राज्यस्तरावरील प्रत्येकी एक प्रतिनिधी | सदस्य |
| १३ | महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १४ | उप जिल्हाधिकारी व राज्य समन्वयक ई-पीक पाहणी प्रकल्प | सदस्य सचिव |

**(ब) विभागस्तरीय संनियत्रण समिती**

| अ.क्र. | पदनाम | अध्यक्ष/ सदस्य |
|---|---|---|
| १ | विभागीय आयुक्त | अध्यक्ष |
| २ | विभागीय कृषी सह संचालक | सह अध्यक्ष |
| ३ | मुख्यालयातील अधिक्षक कृषी अधिकारी | सदस्य |
| ४ | विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था | सदस्य |
| ५ | पणन मंडळाचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | मुख्यालयाचा निवासी उप जिल्हाधिकारी किंवा डी.डी.ई. | सदस्य |
| ७ | उपायुक्त, महसूल | सदस्य सचिव |
| ८ | टाटा ट्रस्टचे प्रतिनिधी | सदस्य |

९१३

| | | |
|---|---|---|
| ९ | अग्रणी बँक व पीक विमा कंपनीचे विभागीय स्तरावरील प्रत्येकी एक प्रतिनिधी | सदस्य |

**(क) जिल्हास्तरीय संनियत्रण समिती**

| अ.क्र. | पदनाम | अध्यक्ष/ सदस्य |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | निवासी उप जिल्हाधिकारी किंवा डी.डी.ई. | सदस्य सचिव |
| ३ | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी | सदस्य |
| ४ | अधिक्षक, भूमी अभिलेख | सदस्य |
| ५ | जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी | सदस्य |
| ६ | टाटा ट्रस्टचे प्रतिनिधी/ जिल्हा समन्वयक | सदस्य |
| ७ | जिल्हयातील कृषी महाविदयालयाचे प्राचार्य (असल्यास) | सदस्य |
| ८ | अग्रणी बँक व पीक विमा कंपनीचे जिल्हास्तरावरील प्रत्येकी एक प्रतिनिधी | सदस्य |

**(ड) तालुकास्तरीय संनियत्रण समिती**

| अ.क्र. | पदनाम | अध्यक्ष/ सदस्य |
|---|---|---|
| १ | उप विभागीय अधिकारी | अध्यक्ष |
| २ | उप विभागीय कृषी अधिकारी | सह अध्यक्ष |
| ३ | तहसिलदार | सदस्य |
| ४ | तालुका कृषी अधिकारी | सदस्य सचिव |
| ५ | अग्रणी बँक व पीक विमा कंपनीचे तालुका स्तरावरील प्रत्येकी एक प्रतिनिधी | सदस्य |

३. "ई-पीक पाहणी" हा कार्यक्रम संपूर्ण राज्यात यशस्वीपणे राबविण्यासाठी, पुढीलप्रमाणे प्रकल्प अंमलबजावणी कक्षाची स्थापना जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमी अभिलेख, पुणे यांच्या नियंत्रणाखाली करण्यात येत आहे.

**(अ) प्रकल्प अंमलबजावणी कक्ष**

| अ.क्र. | पदनाम | अध्यक्ष/ सदस्य |
|---|---|---|
| १ | उप जिल्हाधिकारी व राज्य समन्वयक-ई पीक पाहणी प्रकल्प | अध्यक्ष |
| २ | कृषी अधिकारी (वर्ग-१) | सदस्य |
| ३ | टाटा ट्रस्ट्स यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र पूणे यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र पूणे यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | महा आयटीचे प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | दोन विषयतज्ञ महसूल अधिकारी/ कर्मचारी | सदस्य |
| ८ | दोन विषयतज्ञ कृषी अधिकारी/ कर्मचारी | सदस्य |
| ९ | कक्ष अधिकारी- ई पीक पाहणी प्रकल्प | सदस्य सचिव |

४. *"ई-पीक पाहणी"* हा कार्यक्रम संपूर्ण राज्यात यशस्वीपणे राबविण्यासाठी, जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख,महाराष्ट्र राज्य यांच्यावर पुढील जबाबदारी सोपविण्यात येत आहेत :-

अ) सदर कार्यक्रम राबविताना महसूल आणि कृषी विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणा, जमाबंदी आयुक्त, NIC, माहिती व तंत्रज्ञान उपविभाग, अर्थ व सांख्यिकी

संचालनालय आणि Tata Trusts यांच्या भूमिका निश्चित करण्याबाबत मार्गदर्शक सूचना काढणे.

ब) सदर कार्यक्रमांतर्गत नवीन प्रणालीमध्ये, पीक पेरणी अहवाल नोंदविण्यासाठी शेतकऱ्यांनी स्वत: माहिती उपलब्ध करुन देण्याची कार्यपध्दती ( Procedure of Self Reporting of Crops by farmers) निश्चित करणे.

क) *"ई-पीक पाहणी"* हा कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी, क्षेत्रीय स्तरावरील पूर्वतयारी करणे, संबंधितांना प्रशिक्षण देणे, मार्गदर्शन करणे, ई-पीक पाहणी ॲपसंबंधीचे हस्तांतरण इत्यादिसंदर्भात आवश्यकतेनुसार दिशानिर्देश देणे.

ड) सदर कार्यक्रमाची प्रचार व प्रसिध्दी करणे.

५. सर्व संबंधित क्षेत्रीय प्राधिकारी व अधिकारी यांनी या कामासाठी टाटा ट्रस्ट्स च्या नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्याने सदर कार्यक्रम यशस्वी पध्दतीने राबविण्याची खबरदारी व दक्षता घ्यावी.

६. सदर कार्यक्रम संपूर्ण राज्यात राबविण्याबाबत टाटा ट्रस्ट्स आणि महाराष्ट्र शासन यांच्यातील सामंजस्य कराराची प्रत (M.O.U.) लवकरच सर्व संबंधितांना पाठविण्यात येईल.

७. NIC यांनी मागील तीन कृषी वर्षाचा गाव नमुना नं.१२ मधील record केलेला तपशील टाटा ट्रस्टस यांच्या नामनिर्देशित सल्लागारांकडे तातडीने editable soft copy मध्ये उपलब्ध करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०७३०१६११०५८८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAMESH SHIVAJI CHAVAN

Digitally signed by RAMESH SHIVAJI CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, [illegible], cn=RAMESH SHIVAJI CHAVAN
Date: 2021.07.30 16:17:13 +05'30'

(रमेश चव्हाण)

शासनाचे सह सचिव

प्रत,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई-३२
३) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
६) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७) महालेखापाल (लेखापरीक्षा) (लेखा व अनुज्ञयेता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
८) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे वि.का.अ./स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई.
९) प्रधान सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई

१२) सर्व विभागीय आयुक्त.
१३) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) सर्व जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी.
१५) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय,मुंबई-३२.
१६) राज्य समन्वयक, एनआयसी, मंत्रालय, मुंबई-३२.
१७) सर्व सह सचिव / उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभाग,
१९) "ज"समूहातील सर्व अवर सचिव /कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मुंबई.
२०) श्री.जयंतकुमार बांठिया, माजी मुख्य सचिव,
२१) मुख्य कार्यकारी अधिकारी, टाटा ट्रस्टस, वर्ल्ड ट्रेड सेंटर, २६ वा मजला, सेंटर वन इमारत, वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबई-४०० ००५
२२) मॅनेजिंग ट्रस्टी, टाटा ट्रस्ट, वर्ल्ड ट्रेड सेंटर, २६ वा मजला, सेंटर वन इमारत, वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबई-४०० ००५
२३) निवड नस्ती (कार्यासन ज-१ अ)

****